**वि. प. मार्ग पोलीस ठाणे,मुंबई दि. ११/०१/२०२२**

**—ःप्रेस नोटः—**

**०४ महीन्याच्या बालीकेचे अपहरण करून विक्री करणाऱ्या आंतरराज्यीय टोळीचा पर्दाफाश करून बालीकेचा चार दिवसात महाराष्ट्र, कर्नाटक व तामिळनाडु राज्यात अविरत शोध घेवुन तिला सेलवानपट्टी, कोईमतुर, तामिळनाडु येथुन सुखरूप ताब्यात घेतले व एकुण ११ आरोपीतांना कौशल्यपुर्वक छापे टाकुन शिताफीने अटक केली.**

| | |
|---|---|
| पोलीस ठाणे | वि. प. मार्ग पोलीस ठाणे, मुंबई |
| गु.र.क्र. व कलम | ०३/२०२२ कलम ३६३, ३७० (४), ३४ भादंवि सह कलम ८१, ८७ जे. जे. ॲक्ट |
| गुन्हा दाखल दिनांक व वेळ | ०३/०१/२०२२ वेळ— ०९.१५ वाजता |
| गुन्हा घडला दिनांक व वेळ | २७/१२/२०२१ वेळ— १०.०० वाजता |
| फिर्यादीचे नाव | श्रीमती अन्वरी अब्दुल रशीद शेख, वय ५० वर्षे |
| अटक आरोपीत | १) इब्राहीम अल्ताफ शेख, वय ३२ वर्षे<br>२) मोहम्मद शेरखान उर्फ शेरू पिर मोहम्मद खान, वय ३९ वर्षे,<br>३) लक्ष्मी दिपक मुरगेश (कौंडर), वय २८ वर्षे,<br>४) श्री. सद्दाम अब्दुल्ला शाह, वय २६ वर्षे,<br>५) अमजद मुन्ना शेख, वय ३८ वर्षे,<br>६) ताहीरा उर्फ रेश्मा गुलाब नबी शेख, वय ३५ वर्षे,<br>७) कार्तिक राजेद्रन, वय— ३१ वर्षे,<br>८) श्रीमती चित्रा कार्तिक, वय— २३ वर्षे,<br>९) तमीळ सेलवन थंगराज, वय— ३६ वर्षे,<br>१०) मुर्ती पलानी सामी, वय ३९ वर्षे<br>११) आनंदकुमार नागराजन, वय ४४ वर्षे |
| हस्तगत मालमत्ता | एकुण रू. ४४,०००/— आणि एक १५,०००/— रू. किंमतीचा मोबाईल फोन |

**गुन्हयाची थोडक्यात हकीकत—**

दि. ०३/०१/२२ रोजी यातील फिर्यादी यांनी वि. प. मार्ग पोलीस ठाणे येथे समक्ष येवुन कळवले की, त्यांच्या रखवालीत असणारी ०४ महीन्याच्या बालीकेचे इब्राहीम शेख नावाच्या इसमाने पळवुन नेले आहे. सदर बाबत त्यांच्या तक्रारीवरून वि. प. मार्ग पोलीस ठाणे येथे गु. र. क्र. ०३/२०२२ कलम ३६३, ३७० (४), ३४ भादंवि सह कलम ८१, ८७ जे. जे. ॲक्ट अन्वये दाखल करून वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली तपास चालु केला.

**तपास—**

प्र. व.पो.नि संध्याराणी भोसले व पोलीस निरीक्षक (गुन्हे) विनायक पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली अधिकारी व अंमलदारांची तपास पथके तयार करण्यात आली. सदर पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी गुन्हयाचा बारकाईने अभ्यास करून तसेच गुप्त बातमीदार व तांत्रिक

विश्लेषनाच्या आधारे मिळालेल्या माहीतीवरून अथक, अविरत प्रयत्न व परिश्रम करून नमुद गुन्हयातील एक आरोपीत नामे इब्राहीम अलताफ शेख यास प्रथम ताब्यात घेतले. त्याच्याकडे सखोल तपास करून सायन, धारावी, मालाड, जोगेश्वरी, नागपाडा, कल्याण, ठाणे अशा विविध परिसरात छापे टाकुन ०२ महीला व ०४ पुरूष अशा एकुण ०६ आरोपीतांना अटक केली.

सदर गुन्हयाच्या तपासात अटक केलेल्या आरोपीतांकडुन गुन्हयातील अपहृत बालीकेस त्यांनी कर्नाटक, तामिळनाडु राज्यामध्ये विक्री केल्याची माहीती प्राप्त झाली. त्या अनुषंगाने पोउनि दिलीप तांबे आणि पोउनि अभिजित देशमुख यांची दोन पथके तामिळनाडु व कर्नाटक या राज्यामध्ये तपासाकरीता तात्काळ रवाना केली.

पोउनि तांबे यांच्या पथकाने तामिळनाडु राज्यात आरोपीतांचा व अपहृत बालीकेचा शोध घेणेकामी तीन जिल्हयामध्ये वेगवेगळया ठिकाणी चार दिवस अविरत विश्रांती न घेता चिकाटीने मानवी कौशल्य वापरून व तांत्रिक तपास करून अपहृत बालीकेस सेलवानपट्टी पोलीस स्टेशन, कोईमतुर, तामिळनाडु येथुन कायदेशीररित्या सुखरूप ताब्यात घेतले. तसेच सदर गुन्हयात सहभागी असलेल्या तामिळनाडु येथील ०१ महीला व ०४ पुरूष अशा एकुण ०५ आरोपीतांना देखील ताब्यात घेतले. अशाप्रकारे सदर गुन्हयात सर्व पोलीस पथकांनी आपले मानवी कौशल्य पणास लावुन जलद गतीने गुन्हा उघडकीस आणला आहे. नमुद बालीकेस आरोपीतांनी ४,८०,०००/— रूपयास विक्री केल्याचे निष्पन्न झाले आहे.

यातील अपहृत बालीकेची आई ही दि. ०१/१२/२१ पासुन तिच्या कामाकरीता बाहेर गेली ती अद्याप परत आलेली नाही, तीचा शोध सुरू आहे. तसेच आरोपी क्र. ०१ इब्राहीम शेख हा बालीकेच्या आईचा मित्र असुन तो लिव इन रिलेशनशिपमध्ये तिच्यासोबत राहत होता. तसेच तो बालीकेचा वडील असल्याचे सांगत आहे. तरी बालीकेच्या पालकांची निश्चित ओळख पटण्याकरीता बालीकेची व आरोपीत क्र. ०१ इब्राहीम याची डी.एन.ए. टेस्ट करण्याची प्रक्रिया चालु आहे. तसेच अपहृत बालीका हीला बाल कल्याण समीती समोर हजर करून त्यांचे आदेश प्राप्त करून सुरक्षित ठिकाणी ठेवत आहोत.

नमुद गुन्हयाचा तपास श्री. विश्वास नांगरे— पाटील, पोलीस सह आयुक्त, कायदा व सुव्यवस्था, बृहन्मुंबई शहर, श्री. दिलीप सावंत, अपर पोलीस आयुक्त, दक्षिण प्रादेशिक विभाग, मुंबई श्री.सौरभ त्रिपाठी, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ०२, मुंबई, श्री. राजेंद्र चव्हाण, सहाय्यक पोलीस आयुक्त, गिरगांव विभाग, मुंबई यांच्या मार्गदर्शनाखाली प्रभारी वरिष्ठ पोलीस निरीक्षक संध्याराणी भोसले व तपास अधिकारी पोलीस निरीक्षक (गुन्हे) विनायक पाटील, सपोनि अमित भोसले, सपोनि अविनाश शिंदे, पोउनि दिलीप तांबे, पोउनि राहुल पाटील, पोउनि हेमंत उगले, पोउनि उषा मस्कर, पोउनि अभिजित देशमुख, पोउनि सचिन आव्हाड, पोह सलीम मुजावर, पोना रूपेश परब, पोना मुन्ना सिंग, पोशि सचिन बरकडे, पोशि संदिप रोकडे, मपोशि शुभांगी देशमुख आणि मपोशि महाबली मुंदिनकेरी यांनी अथक परिश्रम घेवुन उल्लेखनिय कामगिरी केलेली आहे.